www.praja.org Prajafoundation praja.org

शासन यंत्रणेला उत्तरदायी बनविणे हे प्रजाचे ध्येय आहे

**या अंकाविषयी**

**मुंबई महापालिका शाळांमधील कुपोषणाची सद्यस्थिती (2013-14 ते 2015-16)**

**महापालिका शाळेतील तीन विद्यार्थ्यांमागे एक विद्यार्थी कुपोषित**



# PRAJA DIALOGUE

मे 2017 अंक 78

खाजगी वितरणासाठी

## मुख्य लेख

पेंग्विनच्या मुद्यावरून बृहन्मुंबई महानगरपालिकेने आपली प्रतिष्ठा पणाला लावली असली तरी महापालिकेचा खरा आदर्श शहामृग आहे की काय अशी शंका येते. कितीतरी कळीचे प्रश्न समोर आहेत, पण जणू ते अस्तित्वातच नाहीत, असे भासवणे याप्रकारे प्रतिसाद देण्याच्या महापालिकेच्या पद्धतीवरून तरी असेच वाटते. मुंबई महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी कुपोषणग्रस्त आहेत, पण शहामृगी वृत्तीने या वास्तवाकडे डोळेझाक करण्याचे धोरणच महापालिकेने अवलंबलेले आहे.

महापालिकेच्याच आकडेवारीवरून महापालिका शाळांमधील मुलांमधील कुपोषणाची समस्या किती वाढली आहे हे लक्षात येते - 2013-14 मध्ये 30,461 विद्यार्थी (एकूण 4,04,251 विद्यार्थीसंख्येच्या 8%) कुपोषणग्रस्त होते, त्यांची संख्या 2015-16 मध्ये 1,30,680 (एकूण 3,83,485 विद्यार्थीसंख्येच्या 34%) एवढी झालेली आहे. म्हणजेच तीन वर्षांच्या काळात कुपोषणग्रस्त विद्यार्थीसंख्या चार पटीने वाढली आहे. मात्र याच काळात इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजन योजनेचा निधी रू. 29 कोटीवरून रू. 32 कोटी करण्यात आलेला आहे. तसेच इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजन योजनेचा निधी रू. 33 कोटीवरून रू. 39 कोटी करण्यात आलेला आहे. तरतूद आहे मात्र या निधीच्या वापरामध्ये कमालीची घट झाल्याचेही दिसते आहे - इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या निधीचा वापर 81% वरून 65% वर आला आहे, तर इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या निधीचा वापर 83% वरून 64% वर आलेला आहे. आशिया खंडातील सर्वात मोठी महानगरपालिका असा लौकीक असलेल्या मुंबई महानगरपालिकेमध्ये निधीची कमतरता तर नक्कीच नाही, हे यावरून लक्षात येते.

या समस्येमध्ये कोणते प्रभाग अग्रसर आहेत हे ओळखायला फार डोके लढवावे लागणार नाही. वर्ष 2015-16 मध्ये गोवंडी आणि मानखुर्द यांचा समावेश असलेल्या एम/ई वॉर्ड मधील महापालिका शाळेतील सर्वाधिक म्हणजे 15038 मुले कुपोषणग्रस्त आहेत.

या वॉर्डचा मानवी विकास निर्देशांक शहरातील सर्व वॉर्डांच्या तुलनेत सर्वात निम्न आहे (0.05) आणि सेंट्रल आफ्रीकन रिपब्लिक व दक्षिण सुदान या आत्यंतिक गरीब देशांपेक्षाही खालचा आहे. कुपोषण मृत्यूमध्येही याच वॉर्डचे नाव आघाडीवर आहे, त्याखालोखाल सांताक्रुज (एच/ई), कुर्ला (एल) आणि चेंबूर (एम/डब्ल्यू) हे वॉर्ड समस्याग्रस्त आहेत.

कुपोषणग्रस्तांमध्ये मुले-मुली असाही भेद दिसून येतो, आणि ही समस्या मुलींमध्ये अधिक आढळून येते आहे. उदाहरणार्थ, 2015-16 या वर्षात 35% (34,222) विद्यार्थिनी आणि 33% (30,459) विद्यार्थी कुपोषणग्रस्त आढळले.

2015-16 मध्ये इयत्ता पहिलीच्या वर्गातील कुपोषणग्रस्त मुलींचे व मुलांचे प्रमाण अनुक्रमे 43% व 42% होते. याचाच अर्थ एकात्मिक बाल विकास योजना आणि इतर बालकांसाठीच्या इतर कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीमध्ये बरीच सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार महाराष्ट्र राज्याचे एकात्मिक बाल विकास योजनेचे बजेट रू. 2947 (सुधारित अर्थसंकल्प 2016-17) वरून रू. 2033 (अर्थसंकल्पीय तरतूद 2017-18) एवढे कमी करण्यात आले आहे, ही वस्तुस्थितीही या संदर्भात लक्षात घ्यायला हवी.

यापेक्षाही चिंताजनक वास्तव हे आहे की गेल्या तीन वर्षातील कुपोषणग्रस्त विद्यार्थ्यांची संख्या पाहता वरील तुकड्यांमधील कुपोषित विद्यार्थ्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याचे दिसून येते आहे. 2013-14 ते 2014-15 या दरम्यान कुपोषित विद्यार्थीसंख्येमध्ये झालेली वाढ पाहता इयत्ता पहिलीतील मुलांमध्ये 246% (3123 ते 10802) वाढ झाली, तर इयत्ता पाचवीच्या मुलांमध्ये 308% (2591 ते 10,562) वाढ झाली. यामुळे मध्यान्ह भोजन योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीवरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते आहे.

मुलांच्या वाढत्या कुपोषण समस्येमागे अनेक कारणे असू शकतात. उदाहरणार्थ, 2011-12 ते 2015-16 या कालावधीत डायरिया ग्रस्त रूग्णांची संख्या 99,839 वरून 1,19,342 एवढी वाढली. एप्रिल 2015 ते डिसेंबर 2015 डायरियामुळे झालेल्या एकूण मृतांमध्ये 14 वर्षांखालील मुलांची संख्या 29% आहे. लहान वयामध्ये डायरियासारख्या आजाराला बळी पडणाऱ्यांमध्ये मुलांची संख्या कमालीची जास्त असल्याचे यावरून लक्षात येते. तसेच डायरियाच्या फैलावामुळे मुलांची वाढ खुंटते आणि निकृष्ट प्रकृतीची समस्या भावी पिढीचाही ठाव घेत असल्याचे दिसते.

कुपोषणाच्या समस्येला उद्देशून अनेक सरकारी कार्यक्रम व योजना अस्तित्वात आहेत, असे असतानादेखील ही समस्या निपटून काढता आलेली नाही. ज्या उद्देशांसाठी योजना वा कार्यक्रम आखले जातात, त्या उद्देशांची पूर्तता करण्यामध्ये ते असफल होतात, हे आपल्या शासनयंत्रणेचे फार मोठे अपयश आहे. महापालिका शाळेतील कुपोषणग्रस्त मुलांची वाढती संख्या हा तातडीच्या चिंतेचा आणि ठोस कृतीचा विषय झाला पाहिजे. याची दोन कारणे आहेत- पहिले कारण, समाजातील आर्थिक दुर्बल वर्गापर्यंत शिक्षणसुविधा पोहोचवण्यासाठी उभ्या असलेल्या महापालिका शाळा आपली जबाबदारी पूर्ण करण्यात अपयशी ठरत आहेत, आणि दुसरे कारण, मुले हे देशाचे भविष्य असल्याने कुपोषणकडे पाठ फिरवून आपण आपल्या भविष्यकालीन मनुष्यबळाच्या लाभांशाचा अपव्यय करत आहोत.

### # सोशल मिडिया




@Prajafoundation
*विशिष्ट उद्देशाने सरकारी योजना व कार्यक्रम राबवले जात असले तरी कुपोषणाची समस्या दूर झालेली नाही.*
#Prajareport

## आलेख 1 2013-14 ते 2015-16 मधील अंदाजे कुपोषित विद्यार्थीसंख्या




## आलेख 2 2015-16 मधील इयत्तानिहाय अंदाजे कुपोषित विद्यार्थीसंख्या



| Std | % |
|---|---|
| 1 | 13% |
| 2 | 15% |
| 3 | 15% |
| 4 | 15% |
| 5 | 15% |
| 6 | 12% |
| 7 | 11% |
| 8 | 2% |
| 9 | 3% |
| DA | 0.1% |

- इयत्ता 1 ते 9 मधील एकूण कुपोषित अंदाजे विद्यार्थीसंख्येतील 73% विद्यार्थी इयत्ता 1 ते 5 वर्गातील आहेत.
- इयत्ता 1 ते 9 मधील एकूण कुपोषित अंदाजे विद्यार्थी संख्येतील 27% विद्यार्थी इयत्ता 6 ते 9 वर्गातील आहेत.

## आलेख 3 2013-14 ते 2015-16 दरम्यान महापालिका शाळेतील वॉर्डनिहाय सरासरी कुपोषित विद्यार्थी संख्या

| वॉर्डचे नाव | कुपोषित विद्यार्थीसंख्येची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|
| बोरीवली | 05 | 23 |
| कांदीवली | 04 | 24 |
| मालाड | 11 | 18 |
| गोरेगाव | 18 | 12 |
| अंधेरी पश्चिम | 12 | 16 |
| अंधेरी पूर्व | 27 | 06 |
| सांताक्रुझ | 51 | 02 |
| बांद्रा | 12 | 17 |
| दादर | 07 | 21 |
| एलफीस्टन | 08 | 20 |
| ग्रांट रोड | 29 | 05 |
| मरीन लाईन्स | 09 | 19 |
| दहिसर | 06 | 22 |
| मुलुंड | 18 | 11 |
| भांडूप | 23 | 09 |
| घाटकोपर | 22 | 10 |
| कुर्ला | 25 | 08 |
| गोवंडी | 51 | 01 |
| चेंबूर | 44 | 03 |
| माटुंगा | 16 | 14 |
| परेल | 13 | 15 |
| भायखळा | 25 | 07 |
| सँडहर्स्ट | 16 | 13 |
| कुलाबा | 29 | 04 |



**मुंबई महापालिका शाळांतील 2013-16 मधील मध्यान्ह भोजन योजनेचा निधी**

- इयत्ता पहिली ते पाचवी साठीचा अर्थसंकल्पीय अंदाज 2013-14 मधील रू. 29 कोटींवरून 2015-16 मध्ये रू. 32 कोटी करण्यात आला. याच कालावधीत इयत्ता सहावी ते आठवी साठीचा अर्थसंकल्पीय अंदाज रू. 33 कोटींवरून रू. 39 कोटी करण्यात आला. मात्र याच कालावधीत निधीचा वापर इयत्ता पहिली ते पाचवीसाठी 81% वरून 65% वर, तर इयत्ता सहावी ते आठवी साठी 83% वरून 64% वर घसरला, ही चिंताजनक गोष्ट आहे.

## कुपोषण समस्येवर आमदार आणि नगरसेवक यांनी विचारलेले प्रश्न

**तक्ता 1 आमदारांनी 2014 चे हिवाळी अधिवेशन ते 2015 चे पावसाळी अधिवेशन या दरम्यान विचारलेल्या प्रश्नांची संख्या**

| | मुंबई | राज्य |
|---|---|---|
| कुपोषणाच्या समस्येवर प्रश्न विचारणाऱ्या आमदारांची संख्या | 16 | 20 |
| कुपोषणाच्या समस्येवर विचारलेल्या एकूण प्रश्नांची संख्या | 43 | 77 |

- 2014 चे हिवाळी अधिवेशन ते 2015 चे पावसाळी अधिवेशन या दरम्यान मुंबईतील 16 आमदारांनी कुपोषणाच्या समस्येवर 43 प्रश्न / मुद्दे उपस्थित केले.
- कुपोषणामुळे सर्वाधिक गंभीर परिस्थिती असलेल्या सहा वॉर्डातील (एम/ई, एच/ई, एम/डब्ल्यू, ए, डी, आणि के/ई) आमदारांनी या समस्येबाबत केवळ 13 प्रश्न / मुद्दे उपस्थित केले.

**तक्ता 2 नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नांची संख्या**

| | 2013-14 | 2014-15 | 2015-16 |
|---|---|---|---|
| कुपोषणाच्या समस्येवर प्रश्न विचारणाऱ्या नगरसेवकांची संख्या | 15 | 13 | 13 |
| कुपोषणाच्या समस्येवर विचारलेल्या एकूण प्रश्नांची संख्या | 17 | 15 | 16 |

- कुपोषणामुळे सर्वाधिक गंभीर परिस्थिती असलेल्या ए, डी, एम/डब्ल्यू या वॉर्डातील नगरसेवकांनी 2013-16च्या दरम्यान एकही प्रश्न / मुद्दा उपस्थित केला नाही.
- एम/ई या सर्वाधिक कुपोषणग्रस्त वॉर्डमधील नगरसेवकांनी मागील 3 वर्षात या समस्येबाबत केवळ 5 प्रश्न विचारले.

## शालेय आरोग्य सेवा

मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य समितीने 1913 पासून महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थी आरोग्य तपासणी सुरू केली. 1938 पासून ही जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागावर सोपवण्यात आली. तपासणी व उपचारात्मक सेवा उपलब्ध करून मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हा शालेय आरोग्य सेवेचा उद्देश आहे. आजच्या समाजामध्ये प्रतिबंधात्मक सेवा विशेष महत्त्वाच्या मानल्या पाहिजेत. त्याप्रमाणे सकारात्मक भूमिकेतून शालेय आरोग्य सेवा आखल्या पाहिजेत. शालेय आरोग्य सेवेची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत - 1) सकारात्मक निकोप आरोग्य विकास, 2) रोग प्रतिबंध, 3) लवकर निदान, उपचार आणि पाठपुरावा, आणि 4) पोषक वातावरणाची उपलब्धता

उद्देश: महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी केली जाते, यामुळे लवकर निदान करून रोग निदानाचे उपचार देता येऊ शकतात. हे काम 37 आरोग्य सर्वेक्षण केंद्रांमार्फत चालते. प्रत्येक केंद्रात एक वैद्यकीय अधिकारी, एक आरोग्य परिदर्शक आणि एक शिपाई नेमलेले आहेत. प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी पूर्वनियोजित उद्दिष्टे व त्यानुसार कार्यक्रम केलेला असतो.

नियमित वैद्यकीय परिक्षणामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्याकडून विद्यार्थ्यांची पूर्ण तपासणी केली जाते, किरकोळ व कळीच्या आजारांची लक्षणे दिसतात का हे तपासले जाते. त्वचेचे आजार, नेत्रविकास, जीवनसत्वांची कमतरता, जंत, श्वसनमार्गातील दोष, ताप संसर्ग, रक्तपांढरी, डायरिया इत्यादी किरकोळ आजारांसाठीचे परीक्षण यावेळी केले जाते. तसेच हृदयविकार, क्षय, कुष्ठरोग, अपंगत्व इत्यादी मोठ्या आजारांसाठीची तपासणीही केली जाते. आवश्यकतेप्रमाणे उपचारांसाथी सायन, केईएम, नायर, नायर दंतवैद्य, राजावाडी, कूपर आणि भगवती रूग्णालय या ठिकाणी चालू असलेल्या शाळा आरोग्य केंद्रांची संदर्भ सेवा दिली जाते. या केंद्रांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून विद्यार्थ्यांना तपासणी व उपचार मिळातात.

तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, सल्ला, उपचार, शस्त्रक्रिया इत्यादीसाठी शालेय आरोग्य केंद्रांच्या आयोजकांकडून शाळेच्या बसमधून मुलांना रूग्णालयात नेले जाते. मुलांना व त्यांच्या पालकांना योग्य उपचारांची माहिती, तसेच प्रतिबंधात्मक उपाय आणि आरोग्य सुधारण्यासाठी व सल्ला देण्यात येतो. आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना प्रथमोपचार दिले जातात. आरोग्य केंद्रांच्या कर्मचाऱ्यांकडून सर्व शाळांतील इयत्ता पहिलीच्या मुलांना घटसर्प, धनुर्वात किंवा टीटी लस दिली जाते, इयत्ता पाचवी व दहावीच्या विद्यार्थ्यांना टीटी लस दिली जाते. आरोग्य तपासणीखेरीज दैनंदिन प्रपाठातून आरोग्य शिक्षणावरही भर दिला जातो. पालक-शिक्षण बैठकांचे आयोजन करून पालक व शिक्षक यांच्यात आरोग्यविषयक जागरूकता वाढवली जाते. वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून शालेय इमारतीच्या स्वच्छतेची नियमित तपासणी केली जाते, ज्यामुळे शालेय वातावरण स्वच्छ राखले जाईल याची खबरदारी घेतली जाते.

## सेवा

1) प्रतिबंधात्मक सेवा - इयत्ता पहिलीसाठी डीपीटी / धनुर्वात (डिप्थीरिया पर्टुसिस किंवा टिटॅनस) आणि टिटॅनस टॉक्साइड (टीटी) लसीकरण. इयत्ता पाचवी व दहावीतील विद्यार्थ्यांसाठी टिटॅनस टॉक्साइड (टीटी) लसीकरण.

2) उपचारात्मक सेवा - किरकोळ आजारांसाठी दवाखान्याची मोफत सेवा. विशेष शालेय आरोग्य केंद्रांमध्ये मोफत आरोग्य सेवा. शस्त्रक्रिया आणि रूग्णालयातील उपचार सेवा. विशेष पादत्राणे, कृत्रिम पाय, चष्मा इत्यादी पुनर्वसन सेवा व साधने.

3) शालेय आरोग्य सेवेने पालकांच्या मुलाखती घेणे, पालक शिक्षक बैठका घेणे

4) सांख्यिकी सेवा - डाटा विश्लेषण

## काय केले पाहिजे?

- अपेक्षित लाभार्थी लक्षात घेऊन परिणामांचे मोजमाप केले गेले पाहिजे: कुपोषणाच्या समस्येला उद्देशून एकात्मिक बाल विकास योजना, मध्यान्ह भोजन योजना, शालेय आरोग्य तपासणी इत्यादी अनेकविध योजना अस्तित्वात आहे. या सर्व योजना 14 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी आहेत. त्यामुळे या वयोगटातील मुलामुलींच्या कुपोषणाचा स्तर ठराविक कालावधीने तपासला पाहिजे, तो सर्वसामान्य आदर्श पोषण स्तराशी पडताळून पाहिला पाहिजे, तेव्हाच योजना व कार्यक्रमांच्या परिणामाचे वास्तव चित्र समजून येईल.
- योजना व कार्यक्रमांचे निर्धारित उद्देश साध्य झाले अथवा नाही हे तपासण्यासाठी तटस्थ पक्षातर्फे त्यांचे ऑडिट करावे.
- एम/ई, एच/ई, एम/डब्ल्यू, ए, डी आणि के/ई या कुपोषणाची अतिगंभीर परिस्थिती असलेल्या वॉर्डांकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

## मीडिया कव्हरेज

### पालिका शाळेतील कुपोषित मुलांची संख्या वाढली

**मुंबई :** गेल्या तीन वर्षांत मुंबई महापालिकेच्या शाळांमधील कुपोषित मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, गेल्या तीन वर्षांत पालिकेच्या शाळांमध्ये मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण चौपटीपेक्षा जास्त वाढले आहे. ही धक्कादायक बाब 'प्रजा फाउंडेशन' या 'एनजीओ'ने मंगळवारी पत्रकार परिषदेत मांडली.

या अहवालानुसार कुपोषित मुलांची अंदाजे संख्या २०१३-१४ मध्ये ३० हजार ४६१ (८ टक्के) एवढी होती. त्यात वाढ होऊन २०१५-१६ मध्ये तब्बल एक लाख ३० हजार ६८० (३४ टक्के) झाली आहे. मुंबई पालिकेच्या शाळांमध्ये एक मोठे संकट निर्माण होत असून, सर्व सरकारी पातळ्यांवर जेथे मुलांच्या पोषणासंबंधी काम केले जाते, त्यांनी हा प्रश्न तातडीने हाताळला पाहिजे, असे 'प्रजा'चे संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त निताई मेहता यांनी सांगितले. मुंबई संचालक मिलिंद म्हस्के म्हणाले. 'पालिकेच्या इयत्ता पहिली ते पाचवीसाठी २०१३-१४ च्या अर्थसंकल्पामध्ये अंदाजे २९ कोटी रुपये निधी होता. त्यात वाढ होऊन २०१५-१६ मध्ये ३२ कोटी रुपये झाला तसेच सहावी ते आठवीसाठी अंदाजे ३३ कोटींचा निधी होता, तोदेखील वाढून

**[ गेल्या तीन वर्षांत कुपोषित मुलांच्या संख्येत चौपटीपेक्षा अधिक वाढ ]**

२०१५-१६ मध्ये ३९ कोटी रुपये झाला. याच काळात निधीचा वापर कमी होऊन पहिली ते पाचवीसाठी तो ८१ टक्क्यांवरून ६५ टक्क्यांवर आणि त्याचबरोबर सहावी ते आठवीसाठी ८३ टक्क्यांवरून ६४ टक्क्यांवर आला. एम/पूर्व वॉर्ड, जेथे मुंबईतील सर्वात कमी 'मानव विकास निर्देशांक (एचडीआय) आढळतो, तेथे अनुक्रमे ९,१०० आणि ६,५८६ इतके आहे, अशी माहिती म्हस्के यांनी दिली. गोवंडी आणि मानखुर्द येथे मुंबईतील सर्वात वाईट सामाजिक आणि आर्थिक स्थिती आहे, असे सांगताना, २०१५-१६ मध्ये कुपोषित मुलींची टक्केवारी (३५) कुपोषित मुलांपेक्षा ३३ टक्के जास्त आढळून आली आहे. २०१४-१५ मध्ये हेच प्रमाण मुलींमध्ये २६ टक्के अणि मुलांमध्ये २७ टक्के होते तसेच २०१३-१४ मध्ये मुलींमध्ये ते ९ टक्के आणि मुलांमध्ये ६ टक्के एवढे होते, असे म्हस्के यांनी सांगितले.

पुण्यनगरी Smart Mumbai
बुधवार, ३१ मे २०१७

---

नवभारत टाइम्स
मुंबई › बुधवार, 31 मई 2017

गंभीर मुद्दा | प्रजा फाउंडेशन की रिपोर्ट में हुआ खुलासा, 3 साल में 4 गुना हुए ऐसे मामले

### BMC स्कूलों में हर तीसरा विद्यार्थी कुपोषित

Akhilesh.Pande
@timesgroup.com

**मुंबई :** देश की सबसे बड़ी महानगर पालिका बीएमसी के स्कूलों में पढ़ने वाले 34 प्रतिशत बच्चे कुपोषण के शिकार हैं। यह खुलासा प्रजा फाउंडेशन की एक रिपोर्ट में हुआ। इस रिपोर्ट के अनुसार, बीएमसी स्कूलों में पढ़ने वाला तकरीबन हर तीसरा बच्चा कुपोषण का शिकार है। पिछले 3 सालों में इन स्कूलों में पढ़ने वाले बच्चों में कुपोषण के मामलों में 4 गुना वृद्धि हुई है। प्रशासन की लापरवाही और जनप्रतिनिधियों के उदासीन रवैये के चलते हर साल बच्चों में कुपोषण की समस्या बढ़ रही है। हालांकि बीएमसी की मानें, तो स्कूल में आने वाले बच्चे गरीब और सुविधाविहीन होते हैं और वे स्कूल आने से पहले ही कुपोषण के शिकार होते है।

**लड़कियां अधिक कुपोषित**

मोदी सरकार द्वारा महिलाओं के बेहतर कल के लिए 'बेटी बचाओ बेटी पढ़ाओ' अभियान चलाया जा रहा है। फिर भी बीएमसी स्कूलों में लड़कियां कुपोषण की अधिक शिकार हैं। रिपोर्ट के अनुसार, 2013 में कुल 11,831 कुपोषित बच्चों में 6,893 लड़कियां और 4,938 लड़के थे।

**'बजट खर्च नहीं':** प्रजा के मुताबिक, बच्चों में बढ़ रही इस समस्या के पीछे बजट का खर्च न होना भी एक वजह है। मिड-डे मिल के तहत बीएमसी स्कूलों को मिलने वाले कुल बजट का केवल 65 प्रतिशत ही 2015 में खर्च हुआ।

**सबसे ज्यादा**
1. गोवंडी
2. सांताक्रुज
3. चेंबूर

**सबसे कम**
कांदिवली

**जनप्रतिनिधि गंभीर नहीं**
- बीएमसी में 3 तीन साल में कुपोषण पर पूछे गए केवल 49 प्रश्न
- केवल 41 नगरसेवकों ने बीएमसी में उठाया कुपोषण का मुद्दा
- कक्षा 1 से 5 तक के 73 प्रतिशत विद्यार्थी कुपोषण के शिकार


File Photo

**बीएमसी स्कूलों के विद्यार्थियों में कुपोषण के मामलों में लगातार वृद्धि के लिए प्रशासन की लापरवाही और जनप्रतिनिधियों का उदासीन रवैया जिम्मेदार है।**
- निताई मेहता, प्रजा फाउंडेशन

**बीएमसी स्कूलों में गरीब बच्चे पढ़ते हैं। उन्हें स्कूल आने से पहले ही कुपोषण जैसी समस्या रहती है। हम समय-समय पर उनकी जांच कराकर उपचार भी कराते हैं।**
- आई.ए. कुंदन, अतिरिक्त आयुक्त, शिक्षा विभाग (बीएमसी)

---

MUMBAI 03 DNA
MUMBaI | WeDnesDaY , MaY 31, 2017 | DaIlY neWs & analYsIs

### 1 in every 3 students in civic schools malnourished: Praja

**DNA Correspondent**
correspondent@dnaindia.net

In what reflects a sorry state of provision of nutrition and health among children in the city, a report by civil society NGO Praja has found that one in every three students of municipal schools is malnourished. The children undergo annual medical screening and Praja obtained the data by filing RTIs.

"This report reflects the state of nutrition among the poorest in the city. The government is spending money but is the programme effective?" questioned Nitai Mehta, founder trustee, Praja Foundation.

Close to 3.83 lakh students study in city's municipal schools of which 1.8 lakh were screened in 2015-16. Of these, 34 per cent children were found to be malnourished, according to the report.

The M/E (Govandi) ward performed the worst with the most number of malnourished students followed by H/E (Santacruz) and M/W (Chembur) among the city's 24 wards.

"This does not come as a surprise as Govandi and Mankhurd have the worst socio-economic indicators," said Milind Mhaske, project director at Praja. What does come as a surprise is that, even wards like A (Colaba), D (Malabar Hill, Grant Road) and K/E (Andheri east), have a significant number of malnourished children."

**2015-16 REPORT**

3,83,485
Total number of students

1,89,809
Total number of students screened

64,681
Malnourished students

73% of students are malnourished from class 1 to 5 in municipal schools

27% students are malnourished from class 6 to 9 in municipal schools

---

**पुढील अंक** मुंबईतील शालेय शिक्षण हक्क (आरटीई) निकष या विषयावरील जून 2017 चा अंक जरूर वाचा.

To ______________________

PRAJA.ORG
MAKING DEMOCRACY WORK

*प्रजा फाउंडेशनला निधीसाहाय्य देताना 'प्रजा फाउंडेशन' या नावाने चेक काढावेत आणि **प्रजा ऑफिसला** पाठवावेत. सोबत आपले नाव, ईमेल व इतर संपर्काचे तपशील पाठवावेत. त्यामुळे आमच्या कामाची माहिती व कर सवलतीसाठीचे 80जी प्रमाणपत्र नियमित मिळू शकेल.*

Supported by
European Union
Friedrich Naumann STIFTUNG FÜR DIE FREIHEIT
Ford Foundation
Narotam Sekhsaria Foundation
dasra
Madhu Mehta Foundation

प्रजा फाउंडेशन
पहिला मजला, विक्टोरिया बिल्डींग, एगीयारी लेन,मिंट रोड, फोर्ट, मुंबई 400 001
फोन: 022-2261 8042, 6525 2729 वेबसाईट: www.praja.org, ईमेल: info@praja.org


AGNI9881231865